“डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचे तत्वज्ञान :एक चिकित्सक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत तत्त्वज्ञान विषयातील पीएच.डी.(विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा संक्षिप्त आराखडा

संशोधक

प्रा. संतोष रामभाऊ गायकवाड

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगाखेड
ता. गंगाखेड जि. परभणी

मार्गदर्शक

प्रा.डॉ. सचिन खोकले

तत्वज्ञान विभागप्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गंगााखेड
ता. गंगाखेड जि. परभणी

ऑगस्ट २०२१

“डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराचे तत्वज्ञान :एक चिकित्सक अभ्यास ”

१. प्रस्तावना :

भारत हा अनेक धर्म, संप्रदाय आणि जाती असलेला देश आहे. जात हा चातुर्वर्ण्य व्यवस्थेचा आधार आहे. इथे माणसाचे श्रेष्ठतव त्याच्या गुणवत्तेवर ठरविले जात नसून ते जातीवर ठरविले जाते. जातीवरुन माणसाचे माणूसपण हिरावुन घेऊन त्याला पशूतुल्य जीवन जगण्यास मजबूर केले जाते. जातीव्यवस्थेच्या विळख्यात अडकलेल्या अस्पृश्य माणसाचे शोषण या देशात शतकानुशतके चालूच आहे. दलितांच्या या शोषणाच्या मूळाशी जात हीच असल्याने जातीव्यवस्थेत परिवर्तन केल्याशिवाय अस्पृश्यांच्या परिस्थितीत आणि हिंदु धर्मात सुधारणा होणार नाही हे ओळखुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मानवतावादी बौध्द धर्माचा स्वीकार केला आहे.

टाजही जातीव्यवस्था ही समतेच्या व प्रगतीच्या मार्गातील मोठा अडथळा बनला आहे. जातीमुळे हिंदु समाजाचे उच्च – नीच स्तरात विभाजन झाल्यामुळे विषमता निर्माण होऊन समाजामध्ये दुरावा निर्माण केला गेला. हिंदु धर्मात स्वत:ला श्रेष्ठ समजणाऱ्या व्यवस्थेने वर्णव्यवथेचा पुरस्कार करुन चौथ्या वर्णास अर्थात अस्पृश्य समाजास अत्यंत हीन वागणूक दिली. त्यामुळे हा समाज मूलभूत सुधारणेपासून हजारो वर्ष दुर फेकला गेला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या जातीव्यस्थेबद्दल

म्हणतात, हिंदु धर्माची उभारणी ही विषमतेच्या संकल्पनेवर झालेली आहे. या समाजरचनेस आंबेडकर अनेक मजली मनोऱ्याची उपमा देऊन पुढे म्हणतात, हिंदु धर्मात समाविष्ट होणाऱ्या जाती हया उच्चनीचतेच्या भावनेने प्रेरित झालेल्या आहेत हे उघड सत्य आहे. हिंदु धर्म हा मनोरा आहे व त्यातील प्रत्येक जात ही त्यातील एक एक मजला आहे. अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे या मनोऱ्यास शिडी नाही. त्यामुळे ज्या मजल्यात जो जन्मला त्याने त्याच मजल्यात मरावे. खालच्या मजल्यातील इसम कितीही लायक असला तरी त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातील माणूस कितीही नालायक असला तरी त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची प्रथा नाही.

विषमता आधारित जातीव्यवस्थेच्या मनोऱ्याला सुरुंग लावून जमीनदोस्त करण्याचे प्रयत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यापूर्वी अनेकांनी केले पण या मनोऱ्यास नेस्तनाबूत करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीच केले आहे. हिंदु धर्मात सुधारणा करण्याचे अनेक प्रयत्न आंबेडकरांनी करुन पाहिले पण हिंदु धर्मीयांच्या अस्पृश्य समाजाविषयीच्या मानसिकतेत बदल होत नाही हे पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी येवला मुक्कामी असतांना १९३५ साली धर्मांतराची घोषणा केली. या घोषणेमुळे काही फरक पडेल असे त्यांना वाटते. हिंदु धर्मीयांच्या अस्पृश्य विषयक मानसिकलेत काहीही बदल होत नाही हे पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाच लाख अनुयायांसह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे हिंदु धर्माचा त्याग करुन मानवतावादी बौध्द धर्म स्वीकारला अर्थात धर्मांतर केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमता आधारित हिंदु धर्माचा त्याग करुन स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुता या मूल्यांवर आधारित असलेला मानवतावादी बौध्द धम्म स्वीकारुन अस्पृश्य समाजामध्ये मानवतावाद रुजवून खऱ्या अर्थाने शोषणमुक्त व समता आधारित समाजव्यवस्था निर्माण करुन रक्ताचा एक थेंबही न सांडता धम्मक्रांती घडवून आणली. त्यामुळे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनूयायांना स्वाभिमानाने व सन्मानाने जीवन जगण्यास मदत होत आहे.

२. **संशोधन साहित्याचा आढावा :**

१. **भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रस्तुत ग्रंथामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौध्द धम्माच्या तत्वांचा सुलभ परिचय करुन दिला आहे. या ग्रंथात ८ खंड, ४० भाग, २४८ उपभाग आहेत. ग्रंथातील जवळपास तीन तृतीयांश भाग त्रिपिटकातून उध्दृत केलेला आहे. तसेच अन्य बौध्द साहित्याच्या माध्यमातुन ग्रंथाला वैज्ञानिक दृष्टीकोनातून लिहिले आहे.

२. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीर** : धनंजय कीर यांनी बाबासाहेबांचा प्रत्यक्ष सहवास लाभला असुन बाबासाहेबांच्या व्यक्तीमत्वाचा व कर्तृत्वाचा प्रचंड प्रभाव त्यांच्यावर पडला. याच प्रेरणेने त्यांनी बाबासाहेबांचे चरित्र लिहिले यातून बाबासाहेबांचे व्यक्तीत्व व चरित्र अवगत होते.

३. **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर – शंकरराव खरात** :डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतर करण्याची घोषणा १९३५ साली केलेली होती. त्यानंतर त्यांनी हिंदु धर्मात सुधारणा करण्याचा प्रयत्न केला पण धर्ममार्तंडांनी त्यांना हवा तसा प्रतिसाद दिला नाही. अखेरीस १४ ऑक्टोबर १९५६ रोजी त्यांनी धर्मांतर केले याची कारण मीमांसा शंकरराव खरात यांनी केलेली आहे.

४. **जती व्यवस्थेचे निर्मुलन डॉ. बाबासाहेब आंबेडकर :** या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती व्यवस्थेच्या आधारावर त्याच्या उन्मुलना संबंधात गंभीर चर्चा केली आहे. जाती – व्यवस्थेच्या अन्मुलना संबंधात त्यांनी वेद आणि शास्त्रांना डायनामाईट लावावे लागेल असे प्रतिपादन केले आहे.

५. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखण आणि भाषणे – डॉ. बाबासाहेब आंबेडकर** : महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे –१८ खंड प्रकाशित करण्यात आले आहेत. या खंडामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठिकठिकाणी केलेल्या भाषणांचे संकलन आहे. ही भाषणे बहूतांशी प्रासंगिक स्वरुपाची असली तरी त्यातुन बाबासाहेबांच्या व्यक्तीमत्वाचे अनेक पैलू उलगडतात

त्याचबरोबर या भाषणामधून त्यांचा प्रचंड व्यासंग आणि सखोल चिंतनाची प्रचिती येते.

३. **संशोधन विषयाचे महत्व :**

जुनी मुल्यव्यवस्था जी धर्मशास्त्रावर आधारित होती. ती विषमतावादी समाजव्यवस्था नाकारुन समतेवर व मानवी मुल्यांवर आधारित अशी व्यवस्था हिंदु धर्मात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना निर्माण करावयाची होती. त्यासाठी त्यांनी सत्यागृह केले, चळवळी केल्या. आपल्या चळवळीतून आपल्याला जातीविरहित हिंदु समाज निर्माण करता आला तर ही एक प्रकारची देश सेवाच होईल अशी त्याची ठाम भूमिका होती. पण जातिभेद आणि अस्पृश्यता ही हिंदु धर्माची शिकवण असून जोपर्यंत जातीभेद आहे तोपर्यंत अस्पृश्यता ही राहणारच म्हणून हिंदु धर्मात राहून दलितांचा उध्दार होणे शक्य नाही, त्यांना धर्मांतरशिवाय दुसरा पर्याय नाही अशी आंबेडकरांची पक्की धारणा झालयामुळेच 'मी हिंदू म्हणून जन्मलो पण हिंदू म्हणून मरणार नाही' अशी १९३५ साली येवल्याच्या परिषदेत घोषणा करावी लागली व वीस वर्षे वाट पाहूनही हिंदुंच्या अस्पृश्याता विषयीच्या मानसिकतेत कोणताही बदल होत नाही हे पाहून १४ ऑक्टोबर १९५६ रोजी धर्मांतर करुन बौध्द धम्माचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकार केला.

धर्मांतरानंतर दलितांच्या शैक्षणिक, सामाजिक, आर्थीक, धार्मीक व राजकीय स्थितीत कोणकोणते बदल झालेले आहेत हे पाहणे व हिंदु मानसिकतेत जातीभेदाविषयी काही बदल झालेला आहे का हे ही पाहणे महत्वाचे आहे असे वाटते.

४. **संशोधनाची उदिष्टे :**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरामागील तत्वज्ञान स्पष्ठ करणे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराची कारणमीमांसा स्पष्ट करणे.

३) बौध्द तत्वज्ञानाचे स्वरुप समजावून सांगणे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराने बहिष्कृत समाजात काय बदल झाले याचा अभ्यास करणे.

५) धर्म आणि धम्म यातील भेद विशद करणे.

६) बाबासाहेबांनी धर्मांतरासाठी बौध्द धर्मच का निवडला याची कारणमीमांसा स्पष्ट करणे.

७) धर्मांतराची घोषणा ते धर्मांतर कालावधीतील बाबासाहेबांचे तात्विक चिंतन स्पष्ट करणे.

५. **गृहितके :**

१) प्राचीन काळापासून वर्णव्यवस्था ही विषमतेवर आधारलेली होती.

२) प्राचीन काळापासून वर्णव्यवस्थेतील सर्वांत शेवटच्या म्हणजेच शुद्र वर्णास पशूपेक्षाही अत्यंत हीन वागणूक देण्यात आली.

३) धर्म व्यवस्था ही एक प्राचीन व्यवस्था आहे.

४) माणसाचे माणूसपण नाकारणारा धर्म नाकारणे आवश्यक होते.

५) बाबासाहेबांच्या धर्मांतरामुळे समाज व्यवस्थेत बदल होतो.

६) धर्मांतरामुळे शुद्रांना, दलितांना सन्मानजनक जीवन प्राप्त होते.

७) बाबासाहेब मुल्याधारित व ऐहिकतावादी बौध्द धर्माचा स्वीकार करुन क्रांती घडवून आणतात.

६. **संशोधन पध्दती :**

सदर संशोधनासाठी तथ्य संकलनाच्या प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांचा वापर करुन शोधप्रबंधाचे लेखन विश्लेषणात्मक पध्दतीने व तुलनात्मक पध्दतीने करण्यात येणार आहे. तज्ञ अभ्यासकांच्या भेटी घेऊन त्यांच्याशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतराच्या भूमिकेबद्दल चर्चा करुन धर्मांतराच्या तात्विक चिकित्सेची मांडणी प्रस्तुत प्रबंधात करण्यात येणार आहे.

प्रकरणांची रचना :

प्रस्तुत शोधप्रबंधाची विभागणी एकूण पाच प्रकरणांत करण्यात आली असून त्या प्रकरणांची रचना पूढीलप्रमाणे आहे.

पहिले प्रकरण — प्रस्तावना

पहिले प्रकरण हे संशोधन आराखडयाशी संबंधित असून या प्रकरणात प्रस्तावना, संशोधनाचे महत्व, संशोधनाची उदिष्टे, संशोधनाची गृहितके, संशोधन पध्दती यांची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण दुसरे — डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण :

या प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपण, अस्पृश्य महार जातीत जन्मल्यामुळे त्यांना सोसाव्या लागलेल्या अनंत यातना, त्यांच्या मनावर झालेला खोल परिणाम, बालवयात गौतम बुध्दाच्या चरित्र ग्रंथाचा त्यांच्यावर पडलेला प्रभाव, अस्पृश्यांना दिली जाणारी वागणूक, शिक्षणासाठी करावा लागलेला संघर्ष या गोष्टीची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण तिसरे — डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मचिंतन

प्रस्तुत प्रकरणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विविध धर्मविषयीचे तात्विक चिंतन स्पष्ट करण्यात आले असून त्यांनी बौध्द धम्माची केलेली तात्विक चिकित्सा याची सविस्तर मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे — डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्मांतर : एक सामाजिक क्रांतीपर्व

प्रस्तुत प्रकरणात भारतातील विषमतेवर आधारलेली वर्णव्यवस्था, डॉ. आंबेडकरांनी धर्मांतराची केलेली घोषणा, धर्मांतरामागणी कारणे, नागपूर येथे पाच लाख अनुयायांसह बौध्द धम्माचा केलेला स्वीकार व त्यानंतर बौध्द धम्माचा स्वीकार केलेल्यांच्या सामाजिक, आर्थीक, राजकीय परिस्थितीत झालेले परिवर्तन याचा चिकित्सक अभ्यास या प्रकरणात करण्यात आलेला आहे.

प्रकरण पाचवे — निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात प्रस्तुत संशोधन कार्याची गृहितके आणि उदिष्टे यांना अनुसरुन निष्कर्षांची मांडणी करण्यात येणार आहे. संशोधन कार्याच्या उदिष्टांची पुर्तता व्हावी यासाठी काही महत्वपूर्ण शिफारशी सुचविण्यात येणार आहेत.

निष्कर्ष :

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराने बहिष्कृत समाजात स्वाभिमानाची जाणीव निर्माण झाली आहे.

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराने मानसन्मानाने जगण्यास मदत झाली आहे.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतराने बहिष्कृत अनूयायांच्या मुलांनी शैक्षणिक क्षेत्रात थक्क करणारी प्रगती केली आहे.

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जाणीव जागृतीमुळे आपल्या बांधवांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात सर्वजन एकत्र येऊन न्याय मिळवुन देण्याचा प्रयत्न करतांना दिसतात.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्माविषयी केलेल्या जाणीवजागृतीमुळे इतर धर्मातीलही सुशिक्षित वर्ग मोठया प्रमाणात बुध्द धम्माकडे वळत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले धर्मांतर दलित समाजाला मार्गदर्शक ठरले आहे. आज आंबेडकर अनुयायांची शिक्षणातील प्रगती थक्क करणारी आहे. ज्या हिंदु धर्मात दलित समाजाला न्यायाची, समानतेची व समतेची वागणूक मिळत नाही तो धर्म त्यागून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय विज्ञाननिष्ठेवर आधारित असलेला बौध्द धम्म डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वीकारणे दलित समाजाला प्रगतीकारक व परिणामकारक ठरले आहे. आंबेडकरांनी स्वीकारलेला बौध्द धम्म लोककल्याणाचा जीवन मार्ग आहे. त्यांनी सांगितलेला बौध्द धम्म स्वातंत्र्य, समता, सदाचार आणि न्याय ही सार्वभौम मुल्ये मानणारा जीवनमार्ग असुन सामाजिक नीती व जगाच्या प्रगतीचा विकासमार्ग आहे. आंबेडकरांनी सतत सामाजिक कल्याणाचा विचार करुन लोकशाहीचे संवर्धन करण्यासाठी व मानवतावादी मूल्य रुजविण्यासाठी बौध्द धम्माचा स्वीकार केलेला आहे.

संदर्भ :

१) कठारे दुष्यंत (२०१६) , महामानवाचा महाग्रंथ, यशोदिप प्रकाशन, पुणे

२)	कीर धनंजय (२०११), डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती

३)	कांबळे नारायण (२००२), प्रखर राष्ट्रवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, योजना

४)	डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धर्मांतर का?

५)	खैरमोडे चांगदेव (१९५८), डॉ. भीमराव रामजी आंबेडकर, खंड२, सुगावा प्रकाशन पुणे.

६)	खरात शंकरराव (१९९०), डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मांतर, रौप्य महोत्सवी प्रकाशन पुणे –३०

७)	कीर धनंजय (१९७२), विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानस आणि तत्वविचार, श्री गजानन बुक डेपो, पुणे –३०

८)	Jaronde Dinesh (2017), Buddist Philosophy : Present Situation & Importance, Paygan Publication, Amravaati

९)	गायकवाड प्रदीप (१९९५), महाडचा सत्यागृह आणि मनुस्मृती दहन, क्षितिज पब्लिकेशन, नागपूर

१०)	देवळे शं.रा.(१९९०),आपले बाबासाहेब आंबेडकर, श्रीविद्या प्रकाशन,पुणे –३०

११)	हनवते प्रकाश,हनवते उत्तम (२०१६), डॉ. बाबासाहेब आंबेडकर काल, आज आणि उद्या, निसर्ग पब्लिकेशन, हिंगोली

१२)	मेश्राम केशव – धर्मांतराचे अर्धशतक, लोकवाडयगृह प्रकाशन, मुंबई, २००७

१३)	मोगले, प्रकाश – आमचा बाप आन आम्हीवर एक सत्यशोधक झोत, परिवर्तनाचा वाटसरु, ठाणे

१४)	जाधव नरेंद्र – आमचा बाप आन आम्ही, जनावृत्ती २००७, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई

१५)	प्रदीप गोखले – विचार संजीवनी

१६)	प्रा.दि.के.बेडेकर – अस्तित्ववादाची ओळख

१७)	प्रा. रवींद्र मनोहर – अस्तित्ववाद

१८)	म. गांधी – हिंदु धर्म म्हणजे काय ?

१९) सुधीर प्रकाशन, — डॉ. बाबासाहेबांची अतिशय गाजलेली भाषणे.

२०) लोकराज्य धम्मचक्र परिवर्तन सुवर्ण विशेषांक, ऑक्टोबर २००६ माहिती व जनसंपर्क माहिती संचालनालय, मुंबई.

२१) भारतरत्न डॉ. भीमराव रामजी आंबेडकर — भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म

२२) डॉ. नागोराव कुंभार (संपा) — डॉ. बाबासाहेब आंबेडकर विशेषांक

संशोधक

प्रा. संतोष रामभाऊ गायकवाड

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सचिन खोकले

कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

गंगाखेड ता. गंगाखेड जि. परभणी